**नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०१६ मधील निशाणी क्रमांक ६२ वरील आदेश**

**CNRNO.MHSN070005392016**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ मिलींद मुरलीधर कुलकर्णी यांनी वादी क्र. २ सुलोचना मुरलीधर कुलकर्णी यांच्या मृत्युची नोंद दाव्याच्या सरनाम्यामध्ये घेवून तशी दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी क्र. १ यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. २ सुलोचना मुरलीधर कुलकर्णी या दि. १४ नोंव्हेंबर २०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्याबाबत त्यांनी वादी क्र. २ यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत नि.६२/२ वर दाखल केली आहे. सदर वादी क्र.२ यांच्या मृत्युची नोंद अभीलेखावर घेवून योग्य त्या दुरुस्तीस परवानगी असावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की वादी यांनी वारस रेकॉर्डचाा अर्ज दिलेला नाही. वादी क्र. २ सुलोचना यांचे सर्व वारस रेकॉर्डवर आणलेले नाहीत. वादी क्र.२ यांचेवतीने वादी क्र. १ यांना दावा चालविण्याचा कोणत्याही स्वरुपाचा अधिकार नाही त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

०४. अर्ज,त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द खरेदीपत्र रदद होवून मिळणेसाठी, निरंतर ताकीदीसाठी व वैकल्पीक कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. २ हे मयत झाल्यानंतर त्यांच्या ज्या वारसांच्या हक्कात दावा चालविण्याचा अधिकार येतो ते वारस यापूर्वीच अभीलेखावर आहेत असे अर्जदार यांनी नमूद केले आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास आक्षेप घेवून जरी वादी क्र. २ यांचेसर्व वारस अभीलेखावर घेतले नाहीत असा आक्षेप घेतला असला तरी कोणते वारस अभीलेखावर घेणे बाकी आहेत याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेला आक्षेप विचारात घेता येणार नाही. ज्याअर्थी वादी क्र. २ हे

मयत झाले आहेत व त्यांचे वारस अभीलेखावर आहेत त्याअर्थी नि.क्र १ वर तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी क्र. १ यांनी प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेच्या आत करावी.

KADAM NUTAN SACHIN Digitally signed by KADAM NUTAN SACHIN Date: 2025.10.09 11:57:08 +0530

(श्रीमती एन.एस.कदम)

दिनांक ०८.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathe-mahankal.
Date - 08.10.2025
Order signed by the
Presiding Officer on - 08.10.2025
Order uploaded on -09.10.2025